


# धर्म व्यवस्थापन

जगात अनेक धर्म आहेत. जगातील प्रत्येक माणूस कोणत्या ना कोणत्या धर्मात जन्माला येतो. लहानपणापासून धर्माचे संस्कार त्याच्यावर बिंबवले जातात. त्यामुळे माणूस धर्माशिवाय स्वतःचा विचार करू शकत नाही. धर्मानुसार आचरण हे माणूस आपलं कर्तव्य मानतो. प्रत्येकाला आपल्या धर्माचा अभिमान वाटतो. ते स्वाभाविकही असतं, मात्र कधी कधी दुसऱ्या धर्माचा द्वेष इतका टोकाला जातो, की त्यातून अतिरेकी कृत्यं घडतात. लोकांचे हकनाक बळी जातात. आजच्या काळात अशा गोष्टी घडताना आपण पाहतो. त्यामुळे अनेकांच्या मनात प्रश्नं निर्माण होतात, धर्म काय आहे? धर्म का निर्माण झाले? धर्माचं प्रयोजन काय आहे?

माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे. हे आपण जाणतो. तो समूहाने राहतो. पूर्वी माणूस भटकं जीवन जगायचा. पशुपालन करायचा. भटकंती करतानाही माणसांचे समूह असायचे. नंतर माणसाला शेतीचा शोध लागल्यानंतर तो एका जागी स्थिर झाला. छोट्या-छोट्या वस्त्या करून समूहाने राहू लागला. अशा या समूह-समुदायाला एकत्र राखण्यासाठी, त्यांच्यात संघटितपणा येण्यासाठी काही एका व्यवस्थेची गरज निर्माण झाली. व्यावहारिक पातळीवर ही गरज होतीच, त्याचबरोबर नैतिकतेच्या पातळीवरही होती. एकत्र राहताना व्यक्तीने नीति-नियमांचं पालन करावं, जेणेकरून समुदायात एकोपा, बंधुता, परस्पर प्रेम-सहकार्य नांदेल व एकूण समुदायाची प्रगती होईल. या गरजेतून जी सामाजिक बंधनं निर्माण झाली तसंच समुदायाकरिता जो नैतिक आधार उभा राहिला तो म्हणजे धर्म. थोडक्यात, धर्म म्हणजे, माणसाची

समुदायाप्रती किंवा इतर माणसांप्रती असलेली कर्तव्ये, चारित्र्य शुद्ध राखण्यासाठी तसंच नैतिक आचरणासाठी अमलात आणावयाचे नीतिनियम असं म्हणता येईल. धर्म ही व्यवस्थापनाची गोष्ट आहे. मानवी समुदायाचं व्यवस्थापन. माणसांचं दररोजचं आचरण कसं असावं, सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत माणसाने काय करावं, त्याचप्रमाणे त्याने संपूर्ण आयुष्य कसं जगावं, आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर त्याने काय करावं, हे धर्मांनी सांगितलं आहे. माणसाने आयुष्यात कोणत्या गोष्टी करू नयेत, कोणती कर्मे अनुचित आहेत हेही धर्मांनी सांगितलं आहे. आज माणसाचं जगणं बहुपदरी झालं आहे, माणूस आणि त्याच्या समुदायाचं वर्तन आणि व्यवहार यावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक कायदेकानू निर्माण झाले आहेत. मात्र, आजही धर्मातील नीति-नियमांचा पगडा मानवी समाजावर आहे.

धर्म व्यवस्थेचं एक प्रमुख सूत्र आहे. जगातल्या सर्व धर्मांमध्ये ते दिसून येतं, आणि कदाचित या सूत्रामुळेच धर्म ही एक भक्कम व अभेद्य गोष्ट बनली आहे, हे प्रमुख सूत्र आहे, ईश्वर. हा जगाचा नियंता आहे. त्याला कोणी ईश्वर म्हणतं, कोणी परमेश्वर, कोणी गॉड तर कोणी अल्लाह म्हणतं. माणसाने कसं वागायचं, हे या जगनियंत्याने सांगितलं आहे. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली, येशू ख्रिस्ताने लोकांना उपदेश केला, ईश्वराचा संदेश लोकांपर्यंत पोहचवला, महंमद पैगंबरांनी अल्लाहची शिकवण लोकांना दिली, गौतम बुद्धांना आत्मसाक्षात्कार झाला आणि त्यांनी लोकांना उपदेश केला. या साऱ्यांच्या उपदेशाचं सार ग्रंथबद्ध झालं. हे ग्रंथ धर्मग्रंथ झाले. या ग्रंथांचा प्रभाव मानवी समुदायांवर आजही टिकून आहे. ईश्वराने दिलेल्या आदेशाचं, केलेल्या उपदेशांचं पालन जर माणसाने केलं नाही तर काय होईल? त्याला काय शिक्षा होईल? बहुतेक सर्व धर्मांमध्ये स्वर्ग आणि नरक अशा संकल्पना आहेत. माणूस दूराचारी असेल, तो पापी असेल तर मृत्यूनंतर त्याला त्याचा कृत्यांचा जाब ईश्वराला द्यावा लागेल. त्याच्या पापाची शिक्षा म्हणून त्याला नरकात जावं लागेल. तिथे यातना भोगाव्या लागतील. माणूस सदाचरणी असेल, त्याने जीवनात सतत ईश्वराची आठवण ठेवली असेल, तर त्याला स्वर्ग प्राप्त होईल, तिथे त्याच्या वाट्याला सुख येईल, असं बहुतेक सर्व धर्म सांगतात. म्हणजेच नरकाचं-नरकातल्या यातनांच भय हे माणसाच्या आचरणावर नियंत्रण ठेवण्याचं धर्माचं साधन आहे. माणसाच्या चुकीबद्दल त्याला शिक्षा करणं किंवा सत्कृत्याबद्दल त्याला बक्षीस देणं या गोष्टी ईश्वर आपल्या मर्जीनं करत नाही, किंबंहुना या गोष्टी तो स्वतः करतच नाही, तर माणसाचं



जसं कर्म असेल, तसं फळ त्याला मिळतं असं धर्मशास्त्र सांगतं. म्हणजेच तुमचं आचरण, तुमचं कर्म योग्य, शुद्ध ठेवलं पाहिजे असं धर्माचं सांगणं असतं.

या जगातील ऊर्जा एक आहे. एका उर्जेचं रूपांतर दुसऱ्या उर्जेमध्ये होतं. उदाहरणार्थ, सूर्याचा प्रकाश ही एक ऊर्जा आहे. एखाद्या भिंगाद्वारे सूर्याचे किरण एका बिंदूवर केंद्रित केले, तर तिथे उष्णता निर्माण होते. म्हणजे प्रकाश या उर्जेचं रूपांतर उष्णता या उर्जेत होतं. जलप्रवाहाद्वारे टर्बाइनला गती मिळून चुंबकीय शक्तीचं विद्युत ऊर्जेत रूपांतर होतं, विद्युत ऊर्जेचा उपयोग करून आपण घरात प्रकाश निर्माण करतो. याच विद्युत ऊर्जेद्वारे आपण पाणी गरम करू शकतो, शेगडीवर अन्न शिजवू शकतो म्हणजे विद्युत शक्तीचं रूपांतर प्रकाश व उष्णता या ऊर्जांमध्ये करतो. म्हणजेच ऊर्जा परिवर्तनीय आहे. एका ऊर्जेचं दुसऱ्या ऊर्जेत रूपांतर होतं. म्हणून ऊर्जा एक आहे. मनुष्याचा धर्म सुद्धा एकच आहे. एखाद्या वृक्षाला अनेक फांद्या असतात, अनेक मुळं असतात. मुळं जमिनीतून जीवनरस शोषतात आणि फांद्यापर्यंत पोहचवतात. झाडाचं मूळ तत्त्व कोणतं? तर ते फांद्या किंवा मूळ नसून ते खोड आहे. खोड स्वतंत्र आहे, ते इंडिपेन्डन्ट आहे. याप्रमाणेच धर्म जरी अनेक असले, तरी सर्व धर्मांचं मूळ तत्त्व एक आहे. वेगवेगळे धर्म निर्माण करण्याची कारणं वेगवेगळी असतील, स्थल-काल-परिस्थितीनुसार वेगवेगळे धर्म निर्माण झाले असतील, पण या धर्माच्या गाभ्यातील तत्त्व एक आहे, ते म्हणजे ईश्वराच्या प्रती श्रद्धा आणि मानवासहित समस्त सृष्टीचं कल्याण, असं म्हणता येईल. तुम्ही प्रत्येक धर्मावरील आवरणं उलगडत गेलात तर तुम्ही या सनातन तत्त्वांपर्यंत पोहचाल.

या दृष्टीने विचार केला तर, आपण आपला धर्म, आपली जात, आपली उपजात यांची नोंद कुठल्याही रजिस्टरमध्ये किंवा रेकॉर्डमध्ये करण्याची आवश्यकता असू नये. याचं कारण असं करताना आपणच आपली एका विशिष्ट प्रकारे विभागणी करतो, असं मला वाटतं. आज धर्मा-धर्मांमध्ये कुठे प्रेमाचं तर कुठे द्वेषाचं वातावरण दिसतं. कुठे एका धर्मातल्या लोकांकरिता दुसऱ्या धर्मातील लोक वंदनीय असतात, त्यांना ते मान देतात, त्यांचे सण-उत्सव साजरे करतात. 'सर्व धर्म समभाव' अशा

वृत्तीने लोक वागतात, तर कुठे अन्य धर्मियांचा पराकोटीचा द्वेष केला जातो, परधर्मियांवर बंधनं लादली जातात, त्यांचा जाच केला जातो. ही दोन टोकाची चित्रं जगात दिसतात. जगातल्या वेगवेगळ्या धर्मांचा आपण अभ्यास केला तर, एका धर्माची निर्मिती होऊन तीन हजार वर्षं झाली, दुसऱ्या धर्माला दोन हजार वर्षं, तिसऱ्याला अमुक इतकी वर्षं तर, चौथ्याला तमुक इतकी वर्षं झाल्याचं आढळून येतं. परंतु, हे सर्व धर्म निर्माण होण्याच्या आधीही माणूस होताच, त्यावेळी कोणता धर्म होता? याचा अर्थ, एका धर्माच्या चांगल्या गोष्टींचा स्वीकार करून आणि अयोग्य, कालबाह्य गोष्टींचा त्याग करून नवीन धर्म निर्माण झाले असण्याची शक्यता आहे. म्हणूनच जगात असलेल्या अनेक धर्मांचा अभ्यास करणं, ते योग्य प्रकारे समजून घेणं, त्यांच्या वैशिष्ट्यांचा शोध घेणं हे प्रत्येकाने केलं पाहिजे. अशा अभ्यासांतून आपल्याला धर्माचं मूळ तत्त्व समजू शकतं.

धर्मातील काही रीती, काही पद्धती आत्मिक उन्नतिसाठी जशा महत्त्वाच्या असतात, तशाच जीवन व्यवहारासाठीसुद्धा उपयोगाच्या असतात. मंदिरात दिवसांतून वेगवेगळ्या वेळी आरती होते. आरतीच्या वेळी घंटानाद होतो. या घंटानादाचा उपयोग लोकांना दिवसाची वेळ समजण्यासाठी होतो. चर्चमध्येही विशिष्ट वेळी घंटानाद होतो, त्याचाही उपयोग वेळ समजण्यासाठी होतो. मुस्लीम लोक दिवसांतून पाच वेळी नमाज अदा करतात. हे एक पवित्र कर्तव्य आहे. त्यामुळे मनःशांती मिळते; पण याचबरोबर नमाज अदा करताना शारीरिक व्यायामदेखील घडतो. व्यक्ती आपल्या दैनंदिन कामातून नमाजसाठी थोडा वेळ बाहेर येतो. त्यामुळे पुन्हा काम सुरू करताना ती मनाने प्रसन्न व ताजीतवानी असते. प्रार्थना, नमाज यातून माणूस परमेश्वराची आठवण करतो, त्यामुळे त्याच्यातील अहंकार नष्ट होतो. प्रार्थनेच्या निमित्ताने मंदिरात, चर्चमध्ये, मस्जिदींमध्ये लोक एकत्र येतात. या एकत्रित प्रार्थनेचा परस्परांना लाभ होतो. अशा एकत्र येण्यातूनच ओळखी होतात, गाठीभेटी होतात, एकमेकांचे विचार समजतात, चांगल्या विचारांचा आपापसात प्रसार होतो. अशाप्रकारे व्यक्तीपासून सृष्टीपर्यंत सारं एक व्हावं, हा धर्माचा मूळ उद्देश आहे.

मात्र आजकाल धर्माचं प्रचंड अवडंबर माजवलं जात आहे. प्रत्येकजण आपल्या आपल्या दृष्टीने आपल्या आपल्या धर्माकडे पाहतो. जो तो स्वतःच्या सोयी-सुविधांचा विचार करतो त्यामुळे धर्माच्या या उद्देशाकडे कोणांचही लक्ष नाहीये. अशा परिस्थितीत जर एखादा महायुद्धासारखा प्रसंग उभा राहीला तर त्यावेळी लोक

गोंधळून जातील. लोकांच्या मनामध्ये जर आपल्या वैचारिक दृष्टिकोनाबद्दल आणि सनातन धर्माबद्दल प्रेम नसेल तर त्यांची भावनिक एकजूट होणार नाही. विज्ञान असं सांगतं की, अब्जावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवरील सर्व भूभाग एकमेकांना जोडलेले होते. नंतर काळाच्या ओघात भुपृष्ठावर बदल होत गेले व भूभाग विभागले गेले; जशी भूभागांची विभागणी झाली, तशीच मनुष्याची सुद्धा विभागणी होत गेली आहे. धर्म, जात, भाषा, वंश अशा वेगवेगळ्या प्रकारे माणूस विभागला गेला आहे. त्यामुळे हे जग सगळं एक व्हावं, सगळे भेदभाव संपुष्टात यावेत, सगळी दुःख नाहीशी व्हावीत, प्रत्येकाच्या हाताला काम मिळावं, ते त्याच्या योग्यतेचं मिळावं, त्यानुसार त्याला कामाचा दाम मिळावा, असं वाटत असेल तर माणसाने धर्माच्या उद्देशाचं पालन करावं. ज्याला जास्त दाम मिळत असेल, त्याने त्याचा संचय न करता दान करावं आणि ज्याला कमी दाम मिळत असेल त्याने अधिक कष्ट करण्याची तयारी ठेवावी. ज्यावेळी व्यक्तीला धर्माच्या उद्देशाला विसर पडतो तेव्हा ती भरकटते आणि चुकीच्या गोष्टी करते.

धर्माचं प्रयोजन, धर्माचे उद्देश, धर्माचं व्यवस्थापन या गोष्टीचं शिक्षण इयत्ता पहिलीपासून उच्च शिक्षणापर्यंत अभ्यासक्रमात समाविष्ट केलं पाहिजे. धर्माशी संबधित छोट्या छोट्या धड्यांचा त्यात समावेश हवा. हे शिक्षण सर्व धर्माचं असावं म्हणजे लहान मुलांपासून तरुणांपर्यंत सर्वांना सर्व धर्मांची माहिती मिळेल. एकमेकांच्या धर्मांबद्दलचं अज्ञान दूर होईल. याचबरोबर व्यक्ती हिंदू असेल तर तिला बायबलचा, कुराणाचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन द्यावं, व्यक्ती मुस्लीम असेल तर तिला भगवद्गीतेचा अभ्यास करण्यास प्रोत्साहित करावं, व्यक्ती ख्रिश्चन असेल, तर तिने कुराणाचा अभ्यास करावा. यामुळे एकमेकांच्या धर्मांबद्दल आदरभाव समाजात निर्माण होईल, गैरसमज दूर होतील व धार्मिक सलोखा स्थापन होण्यास मदत होईल. अमुक एखाद्या पवित्र ठिकाणी अन्य धर्मांच्या लोकांना प्रवेश नाकारणं हे मला चुकीचं वाटतं. आज जे धर्म आहेत, त्यांचा उदय होण्यापूर्वीही हजारो वर्षांपासून पृथ्वीवर अनेक संस्कृती नांदत होत्या, त्यापैकी अनेक संस्कृती उत्कर्षाला पोहचल्या होत्या. म्हणजेच तेव्हाही काहीतरी व्यवस्था होतीच. आजच्या आपल्या धर्माच्या बाबतीत आपण कर्मठ न बनता मोकळेपणा स्वीकारला पाहिजे, असं मला वाटतं. धर्माच्या गुण-दोषांवर चर्चा व्हायला हवी, वादविवादही झाले पाहिजेत. मात्र, या गोष्टी माणसाने जबाबदारीने केल्या पाहिजेत. हे जबाबदारीचं भान येण्यासाठी शैक्षणिक



अभ्यासक्रमात धर्माच्या शिक्षणाचा अंतर्भाव असावा, असं मला वाटतं. याचं कारण माणसाला जगण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर कौशल्यां-बरोबरच माणसामध्ये नैतिकता निर्माण करण्याचं काम धर्म करतात.

हीच गोष्ट जातींचीही म्हणता येईल. माणसांची विभागणी अनेक जातींमध्ये तर झालेली आहेच, पण जातींमध्येही अनेक पोटजाती आहेत. आम्ही देशस्थ, आम्ही कोकणस्थ त्यात पुन्हा ऋग्वेदी, यजुर्वेदी, आम्ही ९६ कुळी, आम्ही ९२ कुळी... ९६ कुळी म्हणवणारे किती लोक ९६ कुळांची नावं सांगू शकतात? किंवा त्यामध्ये त्यांच्या कुळाचा क्रमांक किती हे कितीजणांना माहीत असतं? असं असलं तरी प्रत्येकाला आपल्या आपल्या जातीचा आणि उपजातीचा प्रचंड अभिमान असतो. या अभिमानातून जेव्हा संघर्ष निर्माण होतात, दंगेधोपे निर्माण होतात तेव्हा खरंच प्रश्न पडतो, आपण कुठे चाललो आहोत? येशू ख्रिस्ताला क्रूसावर चढवताना ते लोक त्याला क्रूरपणे खिळे ठोकत होते. येशू ख्रिस्ताला प्रचंड वेदना होत होत्या, त्याचं रक्त वहात होतं, तरीही त्याने ईश्वराला म्हटलं, 'हे लोक अज्ञानी आहेत, ते काय करीत आहेत ते त्यांना कळत नाही. त्यांना माफ कर' ही करुणा, ही उदात्त भावना, धर्माचं हे खरं मर्म कोणाला समजत का नाही? जगात धर्म एकच आहे याचं प्रबोधन होण्याची गरज आहे. आज प्रत्येक धर्मात वेगवेगळे गट दिसतात. शिया-सुन्नी, कॅथॅलिक-प्रोटेस्टंट, ब्राह्मण-मराठा-बलुतेदार जाती-जमाती, वगैरे. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांना विरोध होतो. असा विवाह केलेल्या तरुण-तरुणींच्या जीवावर लोक उठल्याची अनेक उदाहरणं आहेत. म्हणूनच असं वाटतं की, जगात माणूस सारा एक आहे, तर त्याचा धर्मही एक आहे. साऱ्यांचा धर्म एक झाला तर साऱ्यांच्या उत्कर्षाचा मार्ग मोकळा होईल.

भाषा हे सुद्धा माणसांच्या भावनांच्या देवाण-घेवाणीचं एक साधन आहे. भाषा ज्ञानाचा प्रसार करते, पण या भाषेवरूनही माणसांमध्ये भेद निर्माण झाले आहेत. माणसाच्या अहंकारासाठी भाषेलाही वेठीला धरलं जात आहे. आपण रेल्वे स्टेशनवर जातो, तेव्हा गावाचं एकच नाव तिथे पाटीवर तीन भाषांमध्ये लिहिलेलं दिसतं. एक स्थानिक भाषेत, दुसरं राष्ट्रभाषेत आणि तिसरं जागतिक भाषेत. जर गावाचं नाव

एकाच भाषेत लिहिलं, तर आंदोलन होतात. रस्त्यावरच्या पाट्या अमुक भाषेतूनच पाहिजेत, प्रश्नांची उत्तरं राज्यभाषेतूनच लिहिली पाहिजेत किंवा नोकरीची मुलाखात जागतिक भाषेतून-इंग्रजीतूनच दिली पाहिजे अशा मागण्या किंवा ठराव होत असतात. वेगवेगळ्या भाषांमध्ये पाट्या लिहिणं, छपाई करणं याच्या खर्चाचा विचार कोण करतो? त्यामुळे माझ्या मनात असा विचार येतो की साऱ्या जगाची भाषा सुद्धा एकच पाहिजे. आपण माझी भाषा, तुझी भाषा या वादातून बाहेर आलं पाहिजे. भाषा हे भावना, विचार व्यक्त करण्याचं माध्यम आहे. भाषा एक झाली तर सारं जग एकत्र येण्यात अडथळा कमी होईल.

एक धर्म, एक भाषा या गोष्टी खूप अशक्य वाटतील पण असं घडणं शक्य देखील आहे. आपण जर सगळ्यांनी मनापासून प्रयत्न केले, माणसा माणसांमध्ये विभागणी करणाऱ्या गोष्टी दूर केल्या, जगाच्या एकीसाठी समर्पितपणे प्रयत्न केले तर हे शक्य होईल. यात अडचणी येतील, अडथळे येतील पण त्यातून सामंजस्याने मार्ग काढता येईल. हे सगळं एका रात्रीत घडेल असं नक्कीच नाही. कदाचित हे स्वप्न मूर्तरुपात येण्यास शे-पाचशे वर्षं लागतील, पण त्याची सुरुवात कुठेतरी व्हायला हवी. भगवद्गीतेत श्रीकृष्णाने म्हटलं आहे, 'धर्माची संस्थापना करण्यासाठी मी पुनः पुन्हा अवतार घेईन.' अशा अवताराची वाट न पाहता आपणच याची सुरुवात केली पाहिजे. विवेक, नैतिकतेची कास धरणं, ही काळाची गरज आहे.